महाराष्ट्र शासन
**नगर परिषद प्रशासन संचालनालय**
तीसरा मजला, शासकीय परिवहन सेवा ईमारत,
सर पोचखानवाला रोड, वरळी, मुंबई – 400 030
☎ 022-24927631 https://www.mahadma.maharashtra.gov.in/ egovdesk.dma@gmail.com

क्र. नपप्रसं/ का-08/ई-गव्हर्नंस/LGDirectory /2020/ 2113 दिनांक- - 8 OCT 2020

प्रति
जिल्हा प्रशासन अधिकारी
नगर विकास विभाग
जिल्हाधिकारी कार्यालय, सर्व जिल्हे.

विषय- Local Government Directory च्या अनुषंगाने आवश्यक माहिती lgdirectory.gov.in या पोर्टल वर अपडेट करणे **बाबत**

संदर्भ- 1. केंद्र शासनाचे पत्र क्र. N-19011(50)/3/2016-e-Panchayat दिनांक 07-10-2020
2. या संचालनालयाचे पत्र क्र. नपप्रसं/का-08/ई-गव्हर्नंस/LGDirectory /2020/1438 दिनांक 22-06-2019
3. या संचालनालयाचे पत्र क्र. जा.क्र. नपप्रसं/का-08/ई-गव्हर्नंस/LGDirectory/2019/2986 दिनांक 26-09-2019
4. या संचालनालयाचे पत्र क्र. जा.क्र. नपप्रसं/ का-08/ई-गव्हर्नंस/LGDirectory/2019/2755 दिनांक 16-09-2019

येथील संदर्भाकीत पत्रान्वये आपणांस Local Government Directory करीता आपले जिल्ह्यातील महानगरपालिका/नगर परिषद/नगर पंचायती ची आवश्यक माहिती अपडेट करण्याबाबत वारंवार कळविण्यात आलेले आहे. तसेच संदर्भाकीत पत्रात नमुद केल्याप्रमाणे केंद्र शासनाकडुन आपले जिल्ह्यांची माहिती अपडेट करण्यासाठी आवश्यक लॉगीन आयडी/पासवर्ड देखील आपण्यास पुरविण्यात आले होते. आपण सदर पोर्टल वर लॉगीन करुन आपले जिल्ह्यातील नगर परिषद/नगर पंचायती यांची माहिती(नाव, सेंसस कोड, वार्ड ई.) तपासुन घ्यावी व काही दुरुस्ती असल्यास ती करुन घ्यावी, तसेच केंद्र शासनाचे निर्देशानुसार LG Directory मधे सर्व महानगरपालिका/नगरपरिषद/नगरपंचायत यांचे लोकसभा मतदार संघ तसेच विधानसभा मतदार संघांची माहिती मॅप करावयाच्या सुचनादेखील निर्गमित करण्यात आलेल्या होत्या.

मात्र अद्यापही अनेक म.न.पा./नगरपरिषद/नगरपंचायती यांनी आपली माहिती(जनगणनेनुसार सेंसस कोड, वार्डांची माहिती, स्थानिक स्वराज्य संस्थेचे/वार्डांचे मराठी भाषेत नाव, लोकसभा मतदार संघ तसेच विधानसभा मतदार संघांची मॅपींग ई.) LG Directory वर अपडेट केलेली नसल्याचे निदर्शनास आलेले आहे.

अ) तरी सर्व जिल्हा प्रशासन अधिकारी यांनी आपले जिल्ह्यातील म.न.पा./न.प./न.पं. यांनी अपुर्ण असलेली माहिती LG Directory प्रणाली मधे तात्काळ अद्ययावत करुन घ्यावी.

ब) तसेच केंद्र शासनाचे संदर्भ क्र. 1 येथील पत्रान्वये त्यांनी खालील नगरपंचायतींची नोंदणी LG Directory मधे नसल्याचे कळविले आहे.

| अ.क्र. | जिल्हा | नगरपंचायत |
|---|---|---|
| 1. | गडचिरोली | आरमोरी |
| 2 | गोंदिया | अर्जुनी-मोरगांव |

तरी जिल्हा प्रशासन अधिकारी गडचिरोली आणि गोंदिया यांनी तात्काळ सदर नगरपंचायतींची नोंदणी LG Directory मधे करुन ईतर आवश्यक माहिती देखील अपडेट करावी.

क) याव्यतिरीक्त खालील नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांची माहिती दर्शविल्याप्रमाणे चुकीची असल्याचे केंद्र शासनाने कळविले आहे.

i) ULBS mapped with Multiple Districts- 1

ii) ULBS in Disturbed State- 9

iii) ULB in which less than three wards- 51

वरील नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांची यादी संलग्न करण्यात येत आहे. तरी उपरोक्त चुकीची माहिती तात्काळ दुरुस्त करुन घ्यावी.

ड) तसेच केंद्र शासनाद्वारे 145 नागरी स्थानिक स्वराज्य संस्था चुकीची माहिती अपडेट केल्यामुळे Invalidate करण्यात आलेल्या आहेत(यादी संलग्न). सदर यादीचे अवलोकन करावे व आपले जिल्ह्यातील नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांची LG Directory पोर्टल वरील माहिती तपासावी. माहिती अचुक असल्यास संबंधित स्थानिक स्वराज्य संस्था स्थापनेचे शासन राजपत्र अपलोड करुन ती Revalidate करुन घ्यावी व त्याबाबत या संचालनालयास अवगत करावे.

**सदर सर्व कार्यवाही दिनांक 10-10-2020 रोजीपर्यंत पुर्ण करुन घ्यावी व तसा कार्यपुर्ती अहवाल या संचालनालयास न चुकता सादर करावा.**

8/X/2020

(भालचंद्र **बेहेरे**)
**उपसंचालक**
**नगरपरिषद प्रशासन संचालनालय**

प्रतिलीपी-

1. मा. प्रधान सचिव(2), नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई यांना माहितीस्तव सविनय सादर.
2. मा. आयुक्त, महानगरपालिका(सर्व). यांना माहिती तथा उचित कार्यवाहीस्तव. आपले महानगरपालिकेची आवश्यक माहिती आपले जिल्ह्याचे प्रशासन अधिकारी यांना तात्काळ उपलब्ध करुन द्यावी व तांत्रिक सम्नवय साधुन आपले महानगरपालिकेची माहिती अद्ययावत/दुरुस्त करुन घ्यावी. मुंबई महानगरपालिका/नवी मुंबई महानगरपालिका यांनी सदर काम करण्यासाठी तांत्रिक अधिकारी यांची नेमणुक करुन त्यांची माहिती तात्काळ या संचालनालयास सादर करावी.
3. प्रादेशिक उप संचालक, नगरपरिषद प्रशासन विभाग, विभागीय आयुक्त कार्यालय, सर्व. आपण आपले विभागातील सर्व म.न.पा./न.प./न.पं यांची LG Directory वरील माहिती अचुक अपलोड होणेकरीता सर्व संबंधितांना आपले स्तरावर सुचित करावे.